**सेशन केस नं. ३३/१५**
**सा.क्र.१ निशाण क्र.२९**

**सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— भानुदास वडिलांचे नांव :— विष्णू येरागी
वय सुमारे :— ४३ वर्षे व्यवसाय :—मोलमजुरी,
रहाणार:— देवबाग,मालवण, तालुका :—मालवण,
जिल्हा:—सिंधुदुर्ग.

........................

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर. व्ही. देसाई सरतपासणी**

दि.२८/११/२०१४ रोजी मला पोलीस निरीक्षक श्री. बुलबुले यांनी मालवण पोलीस स्टेशन येथे बोलाविले. त्याप्रमाणे मी पोलीस स्टेशनला गेलो. त्यावेळी तेथे पोलीस निरीक्षक श्री.बुलबुले, फिर्यादी धुरी, दुसरा पंच विठ्ठल बावकर हजर होते. पोलीस निरीक्षक बुलबुले यांनी आम्हांला असे सांगितले की, फिर्यादी हे त्यांचा शर्ट हजर करत आहेत तो त्यांना जप्त करायचा आहे, त्यांनी पंच म्हणून काम करणेस आम्हांला विनंती केली. आम्ही मान्यता दिली.

२. त्यानंतर फिर्यादी धुरी यांनी एक पांढ—या रंगाचा फुल शर्ट आमचे समक्ष पोलीस निरीक्षक बुलबुले यांच्याकडे दिला. सदर शर्टास समोरील बाजूस दोन खिसे होते. त्याप्रमाणे पोलिसांनी तो शर्ट आमचे समक्ष जप्त करून सील केला. त्याचे लेबलवर आमचे सहया घेतल्या. त्याप्रमाणे पोलिसांनी पंचनामा केला आणि त्यावर आमच्या सहया

घेतल्या. आता मला सदरचा पंचनामा दाखविला, त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क्र.३०** देण्यात येते.

३. मला तो शर्ट दाखविल्यास मी ओळखू शकेन. आता मला अर्टिकल नं. १ पांढ—या रंगाचा फुल शर्ट दाखविला तो तोच आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र.१ ते ३ तर्फे वकील श्री.व्ही.पी. चिंदरकर यांचा**

४. मी देवबाग आणि तारकर्ली गावाचा सन २०१० पासून पोलीस पाटील आहे. पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले होते हे दाखविणेसाठी माझेकडे पंचनामा वगळता कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगतो की, दि.२८/११/२०१४ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलाविले आणि फिर्यादीने माझे समक्ष पांढ—या रंगाचा शर्ट हजर केला आणि तो पोलिसांनी माझेसमक्ष जप्त केला आणि पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की, मालवण पोलीस यांचेबरोबर मी पोलीस पाटील म्हणून अनेक केसीसमध्ये काम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मालवण पोलिसांबरोबर पंच म्हणून अनेक केसीसमध्ये काम केले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी पंच म्हणून काही केसीसमध्ये काम केले आहे. माझे घर ते मालवण पोलीस स्टेशन हे अंतर १२ ते १५ कि.मी.चे आहे. हे म्हणणे खरे नाही की, विठ्ठल एकनाथ बांवकर यांना मी ओळखत नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, सदर शर्टाच्या बटनावर विशिष्ट अशा खुणा नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, शर्टवर असलेल्या नेमप्लेट ची साईज आणि महाराष्ट् पोलीस लोगोची साईज पंचनाम्यात लिहिलेली नाही, कारण त्यांची साईज मोजलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी धुरी याने माझे समक्ष शर्टाची बटने तोडली आणि सदर शर्ट पोलीस निरिक्षक बुलबुले यांच्या ताब्यात माझेसमक्ष दिला. हे म्हणणे खरे आहे की, मळलेला शर्ट आणि धुळीने माखलेला शर्ट यामध्ये फरक आहे.

६. प्रश्न — अर्टिकल नं.१ चा शर्ट हा धुळीने माखलेला नाही.
उत्तर — सदरचे शर्टवर डाग आहेत, ते मातीचे आहेत किंवा नाहीत हे मी सांगू शकत नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, दुस—या पंचाने माझेसमक्ष सही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष काही घडलेले नाही आणि मी आधिच तयार केलेल्या पंचनाम्यावर पोलिसांच्या सांगणेवरून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांचे सांगणेवरून मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र.४ व ५ तर्फे वकील श्री.ए.एस. डिंगणकर यांचा**

८. आरोपी क्र.१ ते ३ यांनी घेतलेला उलटतपास स्विकारला.

फेरतपास नाही.

साक्षीदार यास जबानी समक्ष वाचून दाखविली,
बरोबर असल्याचे त्योन मान्य व कबुल केले.

सही/—
(पी.आर.कदम)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.

दिनांक—०८/०१/२०२०